**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. १४ दिनांक २९/०३/२०२४**

# खूनाच्या गुन्ह्याची उकल करून आरोपीस अटक करण्यात डहाणु पोलीस ठाणे यांना यश.

दिनांक १५/०३/२०२४ रोजी दुपारी १.०० वा.चे पुर्वी डहाणू पोलीस ठाणे हद्दीत लोणीपाडा, पाण्याचे टाकीजवळ, पिंटु फौजदार गुप्ता याची चाळ, रुम क्रमांक ०४ ता. डहाणू जि. पालघर येथे अनिशा रविंद्र रेड्डी ऊर्फ अनिशा बरस्ता खातुन वय २२ वर्षे रा.डहाणू लोणीपाडा पाण्याचे टाकीजवळ पिंटु फौजदार गुप्ता याची चाळ रुम नं. ०५, ता. डहाणू जि.पालघर मुळ रा. मोहिरामपुर फलटा दक्षिण-२४ परगना जि.परगना राज्य-पश्चिम बंगाल ही अज्ञात कारणावरुन मयत स्थितीत मिळुन आल्याने प्रथम चाळ मालक पिंटु फौजदार गुप्ता वय ३८ वर्षे रा. डहाणू यांनी दिलेल्या खबरीवरुन डहाणू पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यु रजि. नं. १०/२०२४ सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे दिनांक १५/०३/२०२४ रोजी अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला होता. सदर अकस्मात मृत्युचे तपासात मयत हिचा गळा दाबून खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने अकस्मात मृत्युचे चौकशी अधिकारी सपोनि/विजया गोस्वामी यांनी अज्ञात आरोपीत याचेविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन डहाणू पोलीस ठाणें येथे गुन्हा रजि. नं. I ७८/२०२४ भादंविसं कलम ३०२ प्रमाणे दिनांक १७/०३/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर खुनाचे गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग यांनी स्वत: तपास हाती घेतला व तांत्रीक माहीतीच्या आधारे आरोपीत मिनाजुद्दीन अब्दुल अजीज मुल्ला ऊर्फ रविंद्र रेड्डी वय २६ वर्षे रा. बागदा ठाणा डायमंड हार्बर, दक्षिण २४ परगणा राज्य पश्चिम बंगाल असे असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीच्या शोधार्थ डहाणू पोलीस ठाण्याचे पोउपनि/मंगेश मुंढे, पोना./मनोज भरसट, पोशि./सुरज लोहार असे पोलीस पथक आरोपीच्या मुळ गावी पश्चिम बंगाल येथे रवाना करण्यात आले होते. त्याठिकाणी सतत ७ दिवस राहुन भाषेची समस्या असतांना अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत शिताफिने व कौशल्यपणास लावुन आरोपीचे ठावठिकाणाची माहीती काढून आरोपी यास ताब्यात घेवुन दिनांक २२/०३/२०२४ रोजी रात्रौ ०२.३० वाजता अटक करण्यात आली व आरोपी यास मुदतीत मा. डहाणू न्यायालयात हजर केले असता आरोपीची दिनांक ०१/०४/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे. आरोपीत याचेकडे तपास करता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग या करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग, श्री. रणवीर बयेस, पोलीस निरीक्षक, डहाणू पोलीस ठाणे, सपोनि/विजया गोस्वामी, पोउपनि/मंगेश मुंढे, वाचक पोउनि/सुर्यकांत सोनावणे, पोउनि/पवार, सहा.फौ./कुंदन तरे, पोहवा/खांडवी, रासम, नांगरे, पोना/मनोज भरसट, पोना/धोडी, पोशि/सुरज लोहार, पोशि/कदम सर्व नेमणुक डहाणु पोलीस ठाणे तसेच पोहवा/६३१ विशाल पाटील, पोशि/१६९ वाल्मीक पाटील, नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.